
G61/BPS105/EE/20160523

वेळ : 3 तास **गुण : 80**

विद्यार्थ्यांसाठी सूचना :

1. विभाग A वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांचा आहे. त्याची उत्तरे उत्तरपत्रिका / OMR Sheet वर नोंदवायची आहेत.

2. OMR Sheet वरील चार पर्यायांपैकी अचूक पर्यायाखालील वर्तुळ काळ्या पेनाने पूर्ण भरावे. वर्तुळ अर्धवट भरल्यास अथवा एका प्रश्नास जास्त वर्तुळ भरल्यास ते उत्तर चुकीचे समजले जाईल.



उत्तराची अयोग्य नोंद



उत्तराची योग्य नोंद

3. बहुपर्यायी प्रश्नांमध्ये सर्वात अचूक उत्तरे नोंदविणे अपेक्षित आहे.

4. विभाग B वस्तुनिष्ठ विनापर्यायी स्वरूपाचा आहे. त्यासाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिली आहे.

5. FY BA साठी उणे पद्धत लागू नाही.

SECTION - A (गुण : 40)

या विभागात एकूण 80 प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला अर्धा गुण याप्रमाणे हा विभाग 40 गुणांचा आहे. या विभागाला उणे गुणपद्धत लागू नाही.

1. भारतामध्ये जनगणना कधी सुरू झाली ?
   a) 1872 b) 1901
   c) 1951 d) 1911

2. मिश्र अर्थव्यवस्थेत खालीलपैकी कोणते क्षेत्र महत्वाचे असते ?
   a) सरकारी क्षेत्र
   b) खाजगी क्षेत्र
   c) सरकारी व खाजगी या दोन्ही क्षेत्रांचे सहअस्तित्व असते
   d) सरकारी व खाजगी ही दोन्ही क्षेत्रे महत्त्वाची नसतात

3. समाजवादी अर्थव्यवस्थेत सरकार खालीलपैकी कोणती भूमिका पार पाडते ?
   a) उत्पादन
   b) उत्पादनाचे वाटप
   c) उत्पादन व उत्पादनाचे वाटप
   d) यापैकी नाही

4. व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण कोणत्या साली झाले ?
   a) 1947 b) 1951
   c) 1991 d) 1969

5. खालीलपैकी कोणती वैशिष्ट्ये भारतीय लोकसंख्येशी निगडीत नाहीत ?
   a) लोकसंख्येची जास्त घनता
   b) कमी आयुमर्यादा
   c) तरूण लोकसंख्येचे जास्त प्रमाण
   d) तरूण लोकसंख्येचे कमी प्रमाण

6. कोणत्या योजनेला रोजगार निर्मितीजनक योजना असे म्हणतात ?
   a) आठव्या b) पाचव्या
   c) सातव्या d) सहाव्या

7. नियोजनाचा सुट्टीचा काळ म्हणून कोणती वर्षे ओळखली जातात ?
   a) 1966-1969 b) 1947-1950
   c) 1991-1994 d) 1975-1978

8. कृषी योजना म्हणून कोणती पंचवार्षिक योजना ओळखली जाते ?
   a) पाचवी b) सहावी
   c) पहिली d) दुसरी

9. नेहरू-महालनोबिस प्रतिमाण कोणत्या पंचवार्षिक योजनेशी निगडीत आहे ?
   a) पहिली b) दुसरी
   c) तिसरी d) चौथी

10. भारतीय नियोजन आयोगाची स्थापना कोणत्या वर्षी झाली ?
    a) 1947
    b) 1950
    c) 1951
    d) 1966

11. घटनेत बजेटला काय संबोधले जाते ?
    a) अर्थ संकल्प
    b) धन विधेयक
    c) वित्तीय विधेयक
    d) वार्षिक वित्तीय विवरणपत्रक

12. 12 व्या वित्त आयोगाचे अध्यक्ष कोण होते ?
    a) वाय. व्ही. रेड्डी
    b) डॉ. सी. रंगराजन
    c) पी. सी. महालनोबीस
    d) मनमोहन सिंग

13. मालमत्ता कर कोणत्या वर्षी रद्द करण्यात आला ?
    a) 1985 b) 1991
    c) 1951 d) 1975

14. सरकारच्या चालु स्वरूपाच्या खर्चाला कोणता खर्च म्हणतात ?
    a) महसुली खर्च b) योजना खर्च
    c) योजनाबाह्य खर्च d) भांडवली खर्च

15. कोणत्या समितीत सर्व सदस्य हे लोकसभेचे असतात?
    a) अंदाज समिती
    b) लोकलेखा समिती
    c) सार्वजनिक निगम
    d) स्थायी समिती

16. नरसिंहम् समिती कशाशी संबंधित आहे ?
    a) उच्च शिक्षण सुधारणा b) कर संरचना सुधारणा
    c) बँकिंग सुधारणा d) नियोजन अंमलबजावणी सुधारणा

17. मुंबई रोखे बाजार ची स्थापना कोणत्या वर्षी झाली ?
    a) 1857 b) 1947
    c) 1991 d) 1877

18. शेअर बाजारातील व्यवहारांवर नियंत्रण ठेवण्याचे काम खालीलपैकी कोणती संस्था करते ?
    a) मुंबई रोखे बाजार (BSE)
    b) SEBI- भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ
    c) RBI रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया
    d) नाबार्ड

19. सरकारची बँक म्हणून कोणत्या बँकेला ओळखले जाते ?
a) RBI-रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया
b) नाबार्ड
c) स्टेट बँक ऑफ इंडिया
d) SEBI-भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ

20. रिझर्व्ह बँकेची स्थापना कोणत्या वर्षी झाली ?
a) 1947
b) 1991
c) 1935
d) 1951

21. चीन-भारत व्यापारामध्ये पुढीलपैकी काय बरोबर आहे ?
a) भारताची निर्यात चीनपेक्षा जास्त आहे
b) भारताची आयात चीनपेक्षा कमी आहे
c) वरीलपैकी दोन्ही बरोबर
d) वरीलपैकी दोन्ही चूक

22. भारतातील एकूण FDI मधील गुंतवणूकदार देशांमध्ये सर्वात जास्त हिस्सा कोणत्या देशाचा आहे ?
a) अमेरिका b) मॉरिशस
c) चीन d) जपान

23. 1991 साली भारताचे अर्थमंत्री कोण होते ?
a) मनमोहन सिंग
b) यशवंत सिन्हा
c) अरूण जेटली
d) पी. व्ही. नरसिंह राव

24. कोणत्या साली 'विशेष आर्थिक क्षेत्रे' स्थापन करण्यात येणार असल्याचे जाहिर केले ?
a) 1991 b) 2001
c) 1969 d) 2014

25. कोणत्या सालापासून गॅटची अंमलबजावणी सूरू झाली ?
a) 1995
b) 1999
c) 1948
d) 1947

26. 1991 नंतरच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेचा प्रवास
a) मुक्त अर्थव्यवस्थेतून समाजवादाकडे
b) समाजवादाकडून संमिश्र अर्थव्यवस्थेकडे
c) संमिश्र अर्थव्यवस्थेकडून मुक्त अर्थव्यवस्थेकडे
d) संमिश्र अर्थव्यवस्थेकडून समाजवादाकडे

27. खालीलपैकी कोणता घटक भारताच्या निर्यातीतील प्रमुख घटक नाही ?
a) चहा
b) कॉफी
c) मसाल्याचे पदार्थ
d) पेट्रोलियम

28. खालीलपैकी कोणता घटक भारताच्या आयातातील प्रमुख घटक नाही ?
a) पेपर
b) अभियांत्रिकी उत्पादने
c) भांडवली वस्तु
d) सोने व चांदी

29. भारताने आतापर्यंत किती वेळा औद्योगिक धोरणे जाहिर केली आहेत ?
a) 5 b) 4
c) 10 d) 6

30. स्वातंत्र्यपूर्व काळात भारताच्या परराष्ट्रीय व्यापारात ____देशाचा सर्वात मोठा हिस्सा होता.
a) अमेरिका b) चीन
c) ब्रिटन d) जपान

31. भाववाढ म्हणजे ____.
a) वस्तुच्या किंमतीत फरक पडतो
b) पैशाच्या खरेदी शक्तीत वाढ होते
c) पैशाची टंचाई जाणवते
d) पैशाची खरेदी शक्ती कमी होते

32. खालीलपैकी किंमत वाढीचा परिणाम कोणता पर्याय नाही ?
a) उत्पादनाच्या वाटपामधील विषमतेत वाढ
b) साठेबाजी व सट्टेबाजीस प्रोत्साहन
c) बचतीचा ओघ कमी
d) बचतीचा ओघ जास्त

33. तुटीचा अर्थभरणा म्हणजे काय ?
a) खर्च वाढवणे
b) कर लादणे
c) मध्येवर्ती बँकेद्वारा नवीन पैसा उभारणे
d) अंदाजपत्रकात तूट निर्माण करणे

34. भारताला आतापर्यंत ____ वेळा तेल धक्के बसले आहेत.
a) 3
b) 4
c) 7
d) 5

35. मागणी स्थिर राहून पुरवठा वाढल्यास किंमतीवर काय परिणाम होतो ?
a) किंमत वाढते
b) पुरवठा कमी होतो
c) किंमत कमी होते
d) a आणि c

36. आम आदमी विमा योजना केव्हा सुरू झाली ?
a) 2006
b) 2007
c) 2008
d) 2014

37. प्रधानमंत्री जन धन योजना _____ वर्षी सुरू झाली ?
a) 2004
b) 2009
c) 2014
d) 2015

38. सभासद राष्ट्रांच्या पुनर्रचनेत व आर्थिक विकासाला मदत करण्यासाठी दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करणे हे कोणत्या संस्थेचे मुख्य काम आहे ?
a) जागतिक बँक b) आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळ
c) आंतरराष्ट्रीय नाणे निधी d) आशियाई विकास बँक

39. शेतकऱ्यांना दीर्घमुदतीचा कर्जपुरवठा करणारी बँक कोणती ?
a) प्रादेशिक ग्रामीण बँक
b) नागरी बँक
c) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक
d) भू-विकास बँक

40. आंतरराष्ट्रीय आर्थिक स्थैर्याला प्रोत्साहन देणे हे _____ चे मुख्य उद्दीष्ट आहे.
a) जागतिक बँक
b) आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळ
c) आंतरराष्ट्रीय नाणे निधी
d) आशियाई विकास बँक

41. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा किती टक्के आहे ?
a) सुमारे 14 %
b) सुमारे 20 %
c) सुमारे 50 %
d) सुमारे 40 %

42. भारताच्या एकूण निर्यातीमध्ये कृषी उत्पादनाचा वाटा किती टक्के आहे ?
a) सुमारे 10 %
b) सुमारे 20 %
c) सुमारे 30 %
d) सुमारे 40 %

43. भारतातील शेतीची उत्पादकता _____ असून लागवडीखालील क्षेत्र _____ आहे.
a) कमी, कमी
b) जास्त, जास्त
c) कमी, जास्त
d) जास्त, कमी

44. खालीलपैकी कोणत्या कारणांमुळे जमिनीची सुपिकता कमी होत नाही ?
a) पाण्याचा अतिवापर
b) रासायनिक खतांचा अतिवापर
c) रासायनिक कीटकनाशकांचा अतिवापर
d) सुधारित व संकरित बियाणे

45. भातावरील कडा कडपा रोग कशामुळे होतो ?
a) बॅक्टेरिया b) जीवाणू
c) विषाणू d) बुरशी

46. कोरडवाहू शेती म्हणजे _____ पेक्षा कमी पाऊस पडणारा प्रदेश होय.
a) 750 मि.मी.
b) 100 मि.मी.
c) 1000 मि.मी.
d) यापैकी नाही

47. राज्यात किती वर्षानंतर कृषी गणना होते ?
a) 20
b) 15
c) 10
d) 5

48. खालीलपैकी कोणते औषध बुरशीनाशक आहे ?
a) बोर्डो मिश्रण b) थायरम
c) मॅन्कोझेब d) वरील सर्व

49. ग्रामदान चळवळीची सुरूवात कोणत्या वर्षी झाली ?
a) 1960
b) 1962
c) 1957
d) 1967

50. कोणत्याही कारणामुळे शेतजमिनीचे तुकडे होणाच्या प्रक्रियेला _____ म्हणतात.
a) अपखंडन
b) उपविभाजन
c) वरील दोन्ही
d) यांपैकी नाही

51. तुकडीकरण प्रतिबंधक व एकत्रीकरण कायदा कधी अस्तित्वात आला ?
a) 1950 b) 1947
c) 1952 d) 1955

52. भूदान चळवळीची सुरूवात कोठे झाली ?
a) महाराष्ट्र
b) आंध्रप्रदेश
c) उत्तरप्रदेश
d) प. बंगाल

53. ____ या उपकरणाने भूगर्भातील पाण्याची पातळी मोजण्यात येते.
a) पीझोमीटर b) लायसीमीटर
c) मॅनिमोमीटर d) हायग्रोमीटर

54. देशातील ____ टक्के जमीन पावसाच्या पाण्यावरच अवलंबून आहे.
a) सुमारे 30
b) सुमारे 40
c) सुमारे 60
d) सुमारे 90

55. खालीलपैकी आधुनिक सिंचनाची पद्धत कोणती ?
a) मोकाट सिंचन b) सारा पद्धत
c) आळे पद्धत d) फवारा सिंचन

56. पाणलोट क्षेत्र विकासाच्या कार्यक्रमाचा मूलभुत गाभा ____ या उद्दिष्टावर आहे .
a) जमीन व जल संधारण
b) रोजगार हमी योजना
c) शेती वनीकरण
d) पर्यावरण सुधारणा

57. डॉ. बोरलॉग यानी ____ या पिकाच्या जाती शोधल्या.
a) ज्वारी b) गहू
c) भात d) बटाटा

58. भारतातील ____ जमीन कोरडवाहू क्षेत्रात मोडणारी आहे.
a) 80 % b) 40 %
c) 50 % d) 30 %

59. पुढीलपैकी कोणत्या घटकामुळे हरित क्रांती घडून आली ?
a) संकरित बियाणे b) ठिबक सिंचन
c) तणनाशाके d) खते

60. ____ साली सघन शेती जिल्हा कार्यक्रम आखण्यात आला.
a) 1960-61 b) 1950-51
c) 1966-67 d) 1990-91

61. दूध हे पूर्ण अन्न आहे. कारण ____
a) त्यात प्रथिने जास्त आहेत.
b) त्यात शर्करा, खनिजे, मूलतत्त्वे आहेत.
c) त्यात जास्त प्रथिने व स्निग्ध पदार्थ आहेत.
d) वरील सर्व पूर्ण घटक

62. म्हशीच्या दूधातील ____या घटकामुळे रंग पांढरा दिसतो.
a) केसीन b) केरोटिन
c) कॅल्शियम d) प्रोटिन

63. कोंबड्यांमधील राणीखेत हा रोग ____ मुळे होतो.
a) जीवाणू b) विषाणू
c) कवक d) वरील सर्व

64. संकरासाठी मेंढीची ____ जात जास्त योग्य आहे.
a) मेरीनो b) दख्खनी
c) नेल्सोर d) गड्डी

65. रत्ना ही आंब्याची जात ____ या संकरातून निर्माण झाली आहे.
a) नीलम × हापूस b) हापूस × नीलम
c) नीलम × केशर d) नीलम × दशहरी

66. योग्य जोडी ओळखा.
a) अंजीर-नॉचिंग b) द्राक्षे-गर्डलिंग
c) आंबा-रिंगिंग d) सर्व बरोबर

67. पिकांचे हवामानानुसार खालीलपैकी वर्गीकरण ओळखा.
a) शीत कटिबंधीय b) समशीतोष्ण
c) उष्ण कटीबंधीय d) वरील सर्व

68. कोरडवाहू फळझाडे अगदी हलक्या जमिनीतही येऊ शकतात कारण ____
a) या झाडांना पाण्याची फारशी गरज नसते.
b) या झाडांची सोटमुळे जमिनीत खोल जाऊन पाणी शोषूण घेतात.
c) या झाडांच्या पानांच्या रचनेमुळे बाष्पीभवन कमी होते.
d) वरील सर्व

69. वन संरक्षणासंबंधी लोकप्रिय चळवळी कोणत्या ?
a) चिपको b) अप्पिको
c) नर्मदा बचाव d) वरील सर्व

70. चंदनाचे तेल चंदनाच्या कोणत्या भागापासून मिळवतात ?
a) साल
b) पान
c) गाभ्याचे लाकूड
d) फुले

71. पर्यावरण विकास व निसर्ग संतुलनाचे महत्त्व लक्षात घेता एकूण भू-भागाच्या किती टक्के क्षेत्र वनांखाली असणे आवश्यक आहे.

a) 20% b) 53%

c) 33% d) 23%

72. प्राणीमात्र व वातावरण यांच्यातील परस्पर संबंधाला काय म्हणतात ?

a) पर्यावरण पद्धती (Ecosystem)

b) पर्यावरणशास्त्र (Ecology)

c) भौगोलिक

d) बायोम (जीवशास्त्रीय)

73. खालीलपैकी मासे अल्पकाळ टिकवण्याची पद्धत कोणती ?

a) वाळविणे

b) धुरविणे

c) खारविणे

d) गोठविणे

74. शार्क लिव्हर ऑईलमध्ये _____ जीवनसत्वाचे प्रमाण भरपूर असते.

a) 'अ'

b) 'क'

c) 'ब'

d) 'ड'

75. गोड्या पाण्यातील मत्स्य संवर्धनासाठी _____ मासे अधिक महत्त्वाचे आहेत.

a) कटला

b) रोहू

c) मृगला

d) वरील सर्व

76. भारताच्या _____ राज्यातून मत्स्य निर्यात अधिक होते तसेच त्या राज्याच्या आहारात मत्स्य वापर ही अधिक आहे.

a) महाराष्ट्र

b) गुजरात

c) केरळ

d) प. बंगाल.

77. शेतकी किंमत आयोग _____ साली स्थापन करण्यात आला.

a) 1964

b) 1965

c) 1966

d) 1967

78. _____ शेतीमध्ये सभासद आपली जमीन व साधणे एकत्रित करतात. एकच घटक मानून उत्पादन काढतात. सभासदांचा मालकी हक्क कायम राहून त्या बदलात व त्या प्रमाणात मोबदला मिळतो.

a) सामूहिक सहकारी शेती b) संयुक्त सहकारी शेती

c) सुधारित सहकारी शेती d) सहकारी कुळ शेती

79. विकसनशील अर्थव्यवस्थेत कोणत्या क्षेत्राची भूमिका महत्त्वाची असते?

a) शेती

b) वस्त्रोद्योग

c) खनिज उत्पादन

d) कारखानदारी

80. दीर्घमुदतीचे कर्ज कोणती बँक देते ?

a) भू-विकास बँक

b) व्यापारी बँक

c) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

d) प्राथमिक सहकारी कृषी संस्था

SECTION - B (गुण : 40)

या विभागात एकूण 40 प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला एक गुण याप्रमाणे हा विभाग 40 गुणांचा आहे. या विभागाला उणे गुणपद्धत लागू नाही.

1. GDP म्हणजे काय ? (दीर्घ रूप)

2. भारतामध्ये आर्थिक क्षेत्रातील सुधारणा कोणत्या वर्षी सूरू झाल्या ?

3. जलद व सर्वसमावेश विकास हे कोणत्या पंचवार्षिक योजनेचे उद्दिष्ट होते ?

4. भारताची वित्तीय तुट किती टक्के आहे ?

5. स्वतंत्र भारताचे पहिले लोकसंख्या धोरण कधी तयार झाले ?

6. महानगरपालिकांच्या उत्पन्नाचा प्रमुख स्रोत कोणता ?

7. शासनाने एखादी बँक/उद्योग स्वतःच्या ताब्यात घेणे याला काय म्हणतात ?

8. रिझर्व बँकेच्या कोणत्या परिशिष्टामध्ये शेड्युल बँकाचा समावेश होतो ?

9. भारतामध्ये सेवाकर कधी सुरू झाला ?

10. रूपयाची किंमत डॉलरच्या तुलनेत कमी झाल्यास त्याला रूपयाचे _____ म्हणतात.

11. किंमत वाढीप्रमाणे मागणी वाढणाऱ्या वस्तुंना _____ वस्तु म्हणतात ?

12. भारताच्या आर्थिक सुधारणांच्या काळचे पंतप्रधान कोण ?

13. पहिले औद्योगिक धोरण कधी झाले ?

14. महागाई मोजण्याचा कोणता निर्देशांक वापरला जातो ?

15. 5% पेक्षा कमी चलन वाढ दर म्हणजे कोणता ?

16. 5-10% चलन वाढ म्हणजे कोणते ?

17. 10% पेक्षा जास्त चलनवाढ म्हणजे कोणती चलवाढ ?

18. LPG सुधारणांमधील P म्हणजे काय ?

19. ब्रेटनवुडस् संघटनांची स्थापना केव्हा झाली ?

20. भारतीय रिझर्व बँकेचे मुख्यालय कोठे आहे ?

21. प्रति एकरी किती उत्पन्न निघाले याला त्या पिकाची काय म्हणतात ?

22. एकूण उत्पन्न किती याला त्या पिकाचे काय म्हणतात ?

23. ऊसाची उत्पादकता कोणत्या राज्याची सर्वाधिक आहे ?

24. एका धावण्याच्या शर्यतीत चार जण एकत्रित धावतात त्याला काय म्हणतात ?

25. वैयक्तिक सत्याग्रहीमधले पहिले सत्याग्रही कोण ?

26. रॅमन मॅगसेसे पुरस्कार कधीपासून दिला जातो ?

27. जगातील सर्वाधिक ज्यू धर्मीयांची टक्केवारी असणार देश कोणता ?

28. सिंचनाची थेंब रोपाच्या मुळाशी घालणारी पद्धती कोणती ?

29. राष्ट्रीय शेती आयोग कोणाच्या नेतृत्वाखाली स्थापन झाला ?

30. हरित क्रांतीचे जनक कोणाला म्हणतात ?

31. 1975 च्या आणीबाणीपूर्वी कोणत्या साली निवडणुक झाली होती ?

32. गाजरामध्ये कोणते विटामिन सापडते ?

33. बालगंधर्व चित्रपटामध्ये त्यांचा आवाज दिलेले गायक कोण ?

34. कोकण कोणत्या प्रकारच्या आंब्यांसाठी प्रसिद्ध आहे ?

35. वनीकरणाची प्रमुख सरकारी योजना कोणती ?

36. देशातील सर्वाधिक वाळवंटीकरण झालेले राज्य कोणते ?

37. आयोडीन अभावी कोणता रोग होतो ?

38. नाबार्ड कोणत्या प्रकारचा पतपुरवठा करते ?

39. कृषी व अर्थशास्त्र यांचे एकत्रित शास्त्र म्हणजे काय ?

40. कृषी व व्यवस्थापन यांचे एकत्रित शास्त्र म्हणजे काय ?